Journal of Research & Development
Vol. 7 (Issue 04), August, 2017
(ISSN-2230-9578)



# जालना जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचे वितरण: एक भौगोलिक विश्लेषण

डॉ. खान ए. आय.
भूगोल विभाग
शासकीय महाविद्यालय, औरंगाबाद

**प्रस्तावना:**

पर्यटन हा अत्याधुनिक व झपाट्याने विकसीत होणारा मानवाचा आर्थिक व्यवसाय आहे. या व्यवसायाचा इतर शास्त्राप्रमाणे भूगोलातही अभ्यास केला जातो. पर्यटन भूगोल एक उपयोजित शास्त्र असून त्याच्या ज्ञानाचा उपयोग पर्यटनाचा विकास व समस्या या बाबतीत केला जातो. पर्यटन व्यवसायाचे स्वरूप गतिमान आहे. पर्यटनाचे अर्थिक महत्व दिवसेंदिवस वाध्त आहे. शिवाय समाजकारण, राजकारण, पर्यावरण व सांस्कृतिक जतन या दृष्टीनेही पर्यटनाला विशेष महत्व आहे. पर्यटनाव्दारे जागतिक सामंजस्य निर्माण होवू शकते.परंतु अलिकडे या व्यवसायात विविध प्रकारच्या समस्या निर्माण होवू लागल्या आहेत. पर्यटन भूगोल हा आर्थिक भूगोलाची महत्वपूर्ण शाखा असून यात पर्यटनाचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. भौगोलिक अंगाने वितरण महत्वाचे असल्याने पर्यटन स्थळांचे परस्परांशी असलेले अंतर अभ्यासले जाते.

**संशोधन क्षेत्र :**

जालना हा जिल्हा मराठवाड्यातील एक अग्रेसर जिल्हा आहे. महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागातील जालना जिल्हा हा सर्वसाधारणपणे महाराष्ट्राच्या मध्यभागी आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलधणा, पूर्वेस परभणी, दक्षिणेस बीड व पश्चिमेस औरंगाबाद जिल्हा आहे. जालना जिल्ह्याचा बहुतांशी भाग मैदानी आहे. अंबड तालुक्यात काही टेकड्या आध्ळून येतात. तसेच जिल्ह्यात वायव्येस अजिंठ्याची पर्वतरांग आहे. जालना जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ ७६१२ चौ.कि.मी. एवढे आहे. जिल्ह्याचे २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १९,५९,०४६ इतकी आहे. जिल्ह्यात पर्जन्याचे प्रमाण सरासरी ६५० ते ७०० मि.मी. एवढे आध्ळते. जिल्ह्याचे तापमान किमान १० ते १२ अंश से. व कमाल तापमान ४० ते ४२ अंश से. इतके आहे. जिल्ह्यात गोदावरी, पुर्णा, दुधना, कुंडलिका, गलाटी, खेळणा, धामना, गिरजा, जीवरेखा या नद्या आहेत.

जालना जिल्ह्यात एकुण ८ तालुके असून, २ उपविभाग व ८ पंचायत समित्या आहेत. जालना जिल्ह्याचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ ७६१२ चौ.किमी. इतके आहे. जनगणना २०११ नुसार जिल्ह्यात ४ शहरे व ९७० गावे आहेत. जनगणना २०११ नुसार जिल्ह्याची एकुण लोकसंख्या १९,५८,४८३. इतकी होती यामध्ये पुरुषांची लोकसंख्या १०१५११६ इतकी तर स्त्रीयांची लोकसंख्या ९,४३,३६७ इतकी होती. जिल्ह्यातील स्त्री-पुरुष गुणोत्तर ९३७ इतके आहे. जिल्ह्यातील एकुण लोकसंख्येपैकी ८०.७६% लोकसंख्या ही ग्रामीण भागात वसलेली आहे तर फक्त १९.२४% लोकसंख्या ही शहरी भागात आहे. जिल्ह्याचा साक्षरता दर हा ७१.०९% इतका आहे.

**जालना जिल्ह्यातील पर्यटन स्थळाचे विश्लेषण:**

जालना जिल्ह्यातील पर्यटन स्थळाचे विश्लेषण करण्यासाठी जिल्ह्यातील अग्रगण्य २० पर्यटन स्थळाचा विचार करण्यात आला आहे. सदरील पर्यटन स्थळाची निवड करताना या पर्यटनस्थळी येणाऱ्या लोकसंख्येचा विचार करण्यात आला आहे.

जालना जिल्हा पर्यटन स्थळांच्या संख्येने व गुणवत्तेने समृध्द असा जिल्हा आहे. जिल्ह्याला समृध्द अशी ऐतिहासिक परंपरा आहे. जिल्ह्यातील एकुण पर्यटन स्थळांपैकी बहुतांश पर्यटन स्थळे ही धार्मिक तर काही ऐतिहासिक पर्यटन स्थळे आहेत. या पर्यटन स्थळास विविध भागातून व परराज्यातून आलेले पर्यटन भेट देत असतात.

भूगोलातील निकटतम पडोसी विश्लेषण हे वस्त्यांचे किंवा विविध बाबींचे वितरणाचे प्रारुप स्पष्ट करते. या विश्लेषणाचे वितरणाचे निर्देशांक हे ० ते २.१५ इतके असते. यामध्ये ० निर्देशांक हा सघनता दर्शविते, १ हा निर्देशांक यादृच्छिक प्रारुप दर्शविते तर २.१५ हा निर्देशांक नियमित प्रारुप दर्शविते. निकटतम पडोसी विश्लेषण तंत्रानुसार जालना जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचे विश्लेषण करण्यात आले असून त्याचे विश्लेषण पुधील प्रमाणे करण्यात येत आहे:


Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Arts
Science A'bad.

तक्ता क्र. १

## पर्यटन स्थळांचे निकटतम पडोसी विश्लेषण

| अ. क्र. | पर्यटन स्थळ | अंतर (किमी) |
|---|---|---|
| १ | मत्स्योदरी देवी | २ |
| २ | श्री खंडोबा-बिलकेश्वर मंदीर (अंबड) | २ |
| ३ | हजरत अश्रफ बियाबाणी साहाब दर्गा (फकराबाद अंबड) | ५ |
| ४ | श्रीराम मंदीर, अंबड | २ |
| ५ | श्री बालाजी मंदीर, अंबड | २ |
| ६ | पोखरणी देवालय (बारव), अंबड | ३ |
| ७ | जांबुवंत गड (जामखेड) | ५ |
| ८ | सोमनाथ व महालक्ष्मी मंदीर (साष्ट पिंपळगांव) | ९ |
| ९ | श्री क्षेत्र विज्ञानेश्वर, आपेगाव | ७ |
| १० | हजरत सैय्यद अल्लाउद्दीन साहब उर्फ सकलादी बाबा दर्गा, रवना-पराडा | १० |
| ११ | श्री क्षेत्र राजूर | १२ |
| १२ | शिवमंदिर, आन्वा, ता. भोकरदन | १३ |
| १३ | विठ्ठल मंदिर, राजूर | २ |
| १४ | आसई, भोकरदन | ८ |
| १५ | श्री समर्थ मंदिर, जांब समर्थ | १२ |
| १६ | जफ्राबाद किल्ला | १० |
| १७ | श्री क्षेत्र जाळीचा देव | ७ |
| १८ | श्री काळुंका माता संस्थान, गांधी चौक जुना जालना | ४ |
| १९ | दत्ताश्रम, जालना | ४ |
| २० | नांगरतास | १५ |
| | अंतर सरासरी | 6.7 |
| | Rn Value | 1 |

स्त्रोत: संशोधकाव्दारा सांख्यिकीय प्रक्रिया



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Asst. Prof.
M.E.S.Class-I
Govt.College of Art's
Science A'bad.

निकटतम पडोसी गणनेसाठी खालील सुत्र वापरले आहे:

$$Rn = \frac{\bar{D}(Obs)}{0{\cdot}5\sqrt{\frac{a}{n}}}$$

| | | |
|---|---|---|
| $\bar{D}(Obs)$ | - | mean observed nearest neighbour distance |
| a | - | area under study |
| n | - | total number of points |
| Rn | - | nearest neighbour value |

तक्ता क्र. १ मधील Rn Value (१) वरुन व नकाशा क्र. १ वरुन असे स्पष्ट होते की, जालना जिल्ह्यामधील विविध पर्यटन स्थळांचे वितरण हे यादृच्छिक (Random) पध्दतीचे आहे. जिल्ह्यातील बहुतांशी पर्यटन स्थळे ही अंबड, जालना व भोकरदन तालुक्यात केंद्रीत झालेली आहेत तर इतर तालुक्यात ती नगण्य संख्येने आहेत.

संदर्भ :


1. Billrge M. (1986): Geography of Religion, The Dictionary of Human Geography Second edition Oxford Black Well.
2. Krisha K Kumar and Mohinder (2009): Basic of Tourism, Theory Operation and Practice, Kanishka Pub. New Delhi.
3. Sharma Shashiprbha (2004): Tourism Education - Principles, Theories and Practices, Kanishka Publication, New Delhi.

४. डॉ. संजयकुमार शर्मा (२००५): पर्यटन मे भूगोल, तक्षशिला प्रकाशन, नई दिल्ली.

५. डॉ. सुरेशचंद्र बन्सल (२००६): पर्यटन एवं यात्रा प्रबन्धन आधारभूत सिध्दांत, मिरी प्रकाशन, साहरगपूर

६. शुक्ल ए.के. (२००१) : पर्यटन विकास, तिवारी पब्लिकेशन, दिल्ली



Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Arts
Science A'bad.